**रे.मु.नं.३६६/२०१५**

**निशाणी क्रमांक १७ खालील आदेश**

१. सदरचा अर्ज वादीने प्रतिवादी ३ विरुध्द 'जैसे थे' चा हुकूम पारीत करण्यासाठी केलेला आहे. वादीचे म्हणणे की, सदरील दाव्यामध्ये प्रतिवादी ३ चे प्रतिनिधी यांनी दावा क्र.१ब या मिळकती संदर्भात नोटीस पाठवून सदर मिळकत दि.२०/५/२०१७ ते २६/५/२०१७ या कालावधीत ताब्यात घेण्याची धमकी दिली. वादीचे म्हणणे, दावा मिळकतीमध्ये वादींची बागायती पिके, डाळींबाच्या बागा, पाईपलाईन अशा वस्तू उभ्या आहेत व प्रतिवादी हे कायदेशीर मार्गाचा अवलंब केल्याशिवाय मिळकतीचा ताबा घेवू इच्छितात व यासाठी प्रतिवादी ३ यांनी मोठा पोलीस बंदोबस्त घेण्याचे ही निश्चित केले आहे, सबब जैसे थे हुकूम करण्यात यावा ही विनंती केली.

२. प्रतिवादी ३ यांना या अर्जाची नोटीसची बजावणी होवून ही हजर न झाल्याने प्रतिवादी ३ विरुध्द म्हणणे नाही हा आदेश झाला.

३. वादीचे वकील श्री. गुंड यांचा युक्तीवाद ऐकला, तसेच प्रतिवादी क्र.३ चे वकील श्री. रासने यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे अवलोकन केले.

४. वादी व प्रतिवादीच्या परस्पर विरोधी कथनांवरून मी खालील प्रश्न उपस्थित केले असुन सदर प्रश्न त्यावरील निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे नमुद करीत आहे -

| | **प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादीने प्रथम दर्शनी आपली बाजु सिध्द केली आहे? | **नाही** |
| २ | न्यायाचा समतोल वादीचे बाजुने आहे काय ? | **नाही** |
| ३ | मनाई हुकूम न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल काय ? | **नाही** |
| ४ | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

५. सदरचा दावा वादी यांनी विरुध्द कब्जाने मालक झालो आहेत, असे जाहीर ठरावासाठी व मनाई हुकूमासाठी सन २०१५ मध्ये केलेला आहे. सदरील दाव्यामध्ये सर्व प्रतिवादी हे हजर होवून, त्यांच्या लेखी कैफियत सादर केलेली नाही.

**प्रश्न क्र.१ ते ३ :-**

६. सदर दावा प्रलंबित असतांना सदरचा अर्ज हा वादीने, निशाणी ५ वरील मनाई हुकूमाचा अर्ज प्रलंबित असतांना हा अर्ज केलेला आहे.

७. वादी यांचे म्हणणे की, ते १९६८ पासून दावा मिळकतीचे ताबा व वहिवाटीमध्ये आहेत. वादी यांनी सरकारी जमिनीवर अतिक्रमण १९६८ साली केलेले आहे व तेव्हापासून ते त्याचा उपभोग घेतात. दाव्यासोबत वादी यांनी दावा मिळकतीवर त्यांचा ताबा असलेबद्दल कोणतेही कागदपत्र दाखल केले नाहीत. वादीच्या केवळ तोंडी पुराव्याशिवाय कोणताही पुरावा वादीचा ताबा दावा जमिनीवर असलेबद्दल नाही. त्याचप्रमाणे सदरचा दावा हा वादीने विरुध्द कब्जाने मालक झालो, असे जाहीर करणेसाठी दाखल केला आहे.

८. वादीचे वकील यांनी **श्रीमती सरलादेवी कुंदनलाल भंडावार वि. शैलेश गौरीशंकर नामदेव, ए.आय.आर. १९९६ बॉम्बे ९८, गोविंदभाई रामजीभाई चौहान वि. गोकूळचंद जुठालाल अग्रवाल आणि इतर १९९६(२) महाराष्ट्र लॉ जर्नल १०६२** या न्यायनिर्णयांचा अधार घेतला. या निकालपत्रांमध्ये असे नमूद केले आहे की, जर एखादी व्यक्ती ताब्यामध्ये असेल तर कायद्याच्या प्रक्रियेचा अवलंब केल्याशिवाय, त्या व्यक्तीस तेथून काढता येणार नाही. सदरील केसमधील ती व्यक्ती ही कायदेशीर ताब्यात असल्याचे नमूद केले आहे. परंतू हाती असलेल्या केसमध्ये वादी हे

कायदेशीर ताब्यात नाही. तसेच ते बरेच वर्षांपासून ताब्यात असलेबद्दल कोणताही पुरावा नाही. सबब, सदरील केसच्या बाबी ह्या वेगळ्या असल्याने या केसला लागू होत नाही.

याउलट प्रतिवादीचे वकील यांनी, **चीफ सेक्रेटरी आणि इतर वि. मथाई कुरीआकोसे आणि इतर ए.आय.आर. १९८९ केरला ११३** या न्यायनिर्णयाचा अधार घेतला. या निकालपत्रामध्ये फॉरेस्टच्या जमिनीबद्दल मनाई हुकूम देतांना खाजगी व्यक्तींविरुध्द नेहमीचा कायदा लागू करु नये असे नमूद केले आहे. हाती असलेल्या केसमध्ये सदरची जमीन ही फॉरेस्टची जमीन आहे. परंतू सदर जमिनीमध्ये वादींचा ताबा हा बरेच वर्षांपासून असलेबद्दल कोणताही पुरावा नाही.

९. विरुध्द कब्जाने मालक झालो आहे हे जाहीर करणेसाठी वादी हे फक्त बचाव घेवू शकतात, असा दावा वादी हे करु शकत नाहीत. वादी हे ब-याच वर्षापासून दावा मिळकतीच्या ताब्यात असलेबद्दल वादीचे दाव्यातील कथनाशिवाय दुसरा कुठलाही लेखी पुरावा पुष्टी करणारा नाही. यावरुन वादीची प्रथम दर्शनी केस सिध्द होत नाही. त्याचप्रमाणे सदरील अर्जात नमूदप्रमाणे प्रतिवादी ३ यांनी, दि.२०/५/२०१७ ते २६/५/२०१७ या कालावधीत अचानक ताबा घेण्याची धमकी दिली अशी नोटीस या अर्जासोबत सादर केली, परंतू आज रोजीपर्यंत अशी कोणताही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या ही कारणास्तव वादीची प्रथम दर्शनी केस दिसून येत नाही. यामुळे न्यायाचा तराजू हा वादीच्या दिशेने झुकत नाही. याउलट, जर मनाई हुकूम दिल्यास प्रतिवादी ३ हे सरकारी यंत्रणा आहे. तसेच दावा मिळकत ही सरकारची मिळकत आहे. यामुळे जर मनाई हुकूम दिल्यास प्रतिवादी यांना वादीपेक्षा जास्त नुकसान होईल, सबब सदरचा अर्ज फेटाळण्यात येत आहे.

**<u>प्रश्न क्र.४ नुसार :-</u>**

१०. प्रश्न क्र.१ ते ३ चे उत्तरावरून खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे-

## <u>आदेश</u>

सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येत आहे.

संगमनेर.
दि.३०/०५/२०१७

( के. पी. जैन देसरडा )
२रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
संगमनेर.